## आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.12.2024** **वार– गुरुवार**

---

**शपथ विधी**

राज्याचे 21वे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी नुकताच मुंबईत आझाद मैदानावर पार पडला. एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी यावेळी राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती या सोहळ्याला उपस्थित आहेत.

**विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अभियांत्रिकी, विज्ञान या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबरोबर सामाजिक विज्ञानाच्या मार्गांचा विकास करण्यासाठी देखील आपलं क्षेत्र विस्तारित केलं आहे, असं नीती आयोगाचे सदस्य डॉ. विजयकुमार सारस्वत यांनी म्हटलं आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 125 व्या पदवी प्रदान समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते आज बोलत होते. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉक्टर सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली  हा कार्यक्रम झाला. या समारंभात 93 हजार 219 विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरित करण्यात आली.तर 28 जणांना सुवर्ण पदकं प्रदान करण्यात आली.

**पुरस्कार**

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा इतिहास सांगताना त्यांच्या कुटुंबातील महिलांचा त्याग, आणि बलिदानही लोकांसमोर आणण्याची गरज आहे, असं मत मुंबईतील स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या कोषाध्यक्ष मंजिरी मराठे यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. यमुनाबाई विनायक सावरकर यांच्या 136 व्या जयंती महोत्सव कार्यक्रमात त्या बोलत होत्या. स्वातंत्र्यवीर सावरकर फाउंडेशनच्या वतीने या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवर महिलांचा यमुनाबाई माई विनायक सावरकर पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

**मोरे**

महाराष्ट्रात बाळशास्त्री जांभेकर यांनी पहिल्यांदा ज्ञानेश्वरीचं मुद्रण करून मुद्रित धर्मग्रंथ दिला, असं प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ सदानंद मोरे यांनी व्यक्त केलं. ध्वनी अक्षर आणि मुद्रण अशी मानवी भाषेची स्थित्यंतरं आहेत. जोपर्यंत ग्रंथ छापले जात नव्हते, तोपर्यंत हस्तलिखित ग्रंथ दुर्मिळ असल्यानं ज्ञानाच्या प्रसारावर मर्यादा होत्या. मात्र मुद्रण कलेनं त्या मर्यादा मोडून टाकल्या, असं मोरे म्हणाले. 'पुणे पुस्तक जत्रा' या प्रदर्शनाचं उद्घाटन काल गणेश कला क्रीडा मंच इथं डॉ. मोरे यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. "ज्ञानसंपन्न समाजाच्या दिशेने" हे या प्रदर्शनाचं ब्रीदवाक्य आहे.

**करार**

पिंपरी चिंचवड शहरातलं बदलतं हवामान, प्रदूषण व्यवस्थापन, नैसर्गिक आपत्तीची पूर्वसूचना आणि आपत्ती व्यवस्थापन करताना राबवल्या जाणाऱ्या उपाययोजना याबाबत माहितीची देवाण घेवाण करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि भारतीय हवामान विज्ञान विभागामध्ये सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारानुसार हवामान खात्याकडून दिली जाणारी माहिती महापालिकेला विविध उपाय योजना आणि नियोजनासाठी उपयुक्त ठरेल असं पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितलं.

**मेट्रो**

पुणे शहरात ठिकठिकाणी मेट्रोचं काम सुरु असल्याने पुणेकरांना वाहतूककोंडीचा सामना करावा लागत आहे. यावर तोडगा काढण्यासाठी पोलीस प्रशासन आणि पुणे मेट्रो प्रशासनाची एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत पुणे मेट्रोचं काम तीन महिन्यात पूर्ण करण्याच्या सूचना पुणे पोलिसांनी दिल्या आहेत. यावेळी मेट्रो अधिकाऱ्यांसह, वाहतूक विभागाचे अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या ढगाळ हवामानासह कमाल 32 तर किमान 20 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**